Estd. 1962

'A++' Accredited by NAAC (2021) With CGPA 3.52

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## प रि प त्र क

07/२०२४

**विषय – गर्भाशयमुखाच्या कर्करोगावरील (कॅन्सर) लसीकरणाबाबत.**

विद्यापीठातील सर्व शिक्षक, अधिकारी व प्रशासकीय सेवक यांना आदेशान्वये कळविण्यात येते की, शिवाजी विद्यापीठातील आरोग्य केंद्रामार्फत विद्यापीठातील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचा–यांच्या वय वर्षे ९ ते १४ व त्यावरील वयोगटातील मुलींना भविष्यातील HPV (Human Papillomavirus Vaccine) for Cervical Cancer चा धोका टाळण्यासाठी सदर कॅन्सरवरील लसीकरणाचा उपक्रम राबविण्यात येणार आहे. वय वर्षे ९ ते १४ या वयोगटातील मुलींना सदर लसीचे प्रत्येकी दोन डोस (०—६ महिने) व १४ वर्षावरील मुलींना प्रत्येकी तीन डोस (०—२—६ महिने) असे घ्यावे लागतील. सदर **एका लसीची किंमत अंदाजे** १५००/— रूपयांपर्यंत आहे. सदरची रक्कम आरोग्य केंद्र विभागात ऑनलाईन स्वरूपात अथवा वेतनातील कपातीव्दारे भरता येईल.

तेंव्हा, विद्यापीठातील ज्या शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचा–यांच्या उपरोक्त नमुद वयोगटातील मुलींना सदर कॅन्सरवरील लस घ्यावयाची आहे, त्यांनी आरोग्य केंद्र येथे दि. ०५/०३/२०२४ पासून दि.०४/०४/२०२४ पर्यंत प्रत्यक्ष नाव नोंदणी करणे आवश्यक आहे.

कुलसचिव

जा. क्रं. आस्थापना/ 363

दिनांक : 29 FEB 2024

**प्रति,**

१. मा. कुलगुरू, मा. प्र.कुलगुरू, मा.कुलसचिव, मा.संचालक परीक्षा व मूल्यमापन मंडळ व मा. वित्त व लेखा अधिकारी यांचे कार्यालयास.
२. सर्व अधिविभागप्रमुख, संचालक, समन्वयक.
३. सर्व उपकुलसचिव, कायदा अधिकारी, जनसंपर्क अधिकारी, सहाय्यक कुलसचिव व समकक्ष अधिकारी. सर्व प्रशासकीय विभागप्रमुख.
४. वैद्यकीय अधिकारी, आरोग्य केंद्र
५. इंटरनेट विभाग – सदरचे परिपत्रक संकेतस्थळावर प्रसिध्द करावे.

**सदरचे परिपत्रक आपल्या विभागातील सर्व शिक्षक, प्रशासकीय सेवकांच्या निदर्शनास आणावे.**